आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

९ फेब्रुवारी २०२६ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीत महायुतीची आघाडी, २ ठिकाणी सत्तेत येण्याची काँग्रेसला आशा

- राज्यात लवकरच ७० हजार पदांसाठी भरती प्रक्रीया सुरू करण्याच्या मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या सूचना

- व्यावहारिक अनुभव घेण्यावर भर देण्याचं परीक्षा पे चर्चामधून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं विद्यार्थ्यांना आवाहन

**आणि**

- राज्य शिक्षण मंडळाची बारावीची परीक्षा उद्यापासून

**<><><><><>**

राज्यातल्या बारा जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीत महायुती आघाडीवर आहे. याद्वारे सरकारनं के◌ेलेल्या कामावर जनतेनं शिक्कामोर्तब केल्याचं स्पष्ट होत असल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत वार्ताहरांशी बोलताना दिली आहे. राज्यभरात जिल्हा परिषद गटातल्या १३६ जागा भाजपाने जिंकल्या आहेत तसंच ४१० पंचायत समितीच्या जागा जिंकल्या आहेत, असं ते म्हणाले.

**- - - होल्ड बाईट मुख्यमंत्री - - -**

सर्व बारा जिल्हा परिषदांमधे महायुतीचीच, तसंच १२५ पैकी ५० पेक्षा जास्त पंचायत समित्यांमधे भाजपाची सत्ता येईल असा दावा भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केला.

काँग्रेस दोन जिल्हा परिषदांमध्ये सत्तेवर येईल आणि दोन ठिकाणी सत्तेत भागीदार असेल, असा विश्वास काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केला आहे.

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांचे निकाल आता जवळपास स्पष्ट झाले आहेत. आतापर्यंत हाती आलेल्या निकालांचं वृत्त ऐकूया आमच्या प्रतिनिधीकडून....

**-----व्हीसी----**

*(**पुणे** जिल्हा परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेसला सर्वाधिक ४८ जागांवर विजय मिळाला असून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष एका जागेवर विजयी झाला आहे. तर भाजपा दहा, शिवसेना चार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष ६ जागांवर विजयी झाला आहे.*

***कोल्हापूर**मधे काँग्रेसला १५ राष्ट्रवादी काँग्रेसला वीस, भाजपाला १२, शिवसेनेला ९ आणि जनसुराज्य पक्षाला ५ जागा मिळाल्या आहेत. तसंच स्वाभिमानी शेतकरी संघटना एक आणि शाहू आघाडीला ४ जागांवर यश मिळालं आहे.*

***सातारा** जिल्हा परिषदेत भाजपाने सर्वाधिक २७ जागांवर विजय मिळवला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने २०, शिवसेना १५, स्वाभिमानी शेतकरी संघटना एक, तर काँग्रेस एका जागेवर विजयी झाली आहे.*

***सिंधुदुर्ग**मधे महायुतीने बहुमत मिळवलं आहे. यात भाजपाला २७ तर शिवसेनेला १४ जागांवर यश मिळालं आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला केवळ तीन जागांवर समाधान मानावं लागलं आहे. पंचायत समित्यांमधल्या शंभर जागांपैकी ८१ जागांवर महायुती विजयी झाली आहे.*

*रत्नागिरीतही ४० जागा जिंकून शिवसेना मोठा पक्ष ठरला असून भाजपाला चार जागा मिळाल्या आहेत. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या एका उमेदवाराचा विजय झाला झाला आहे. तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष सहा, राष्ट्रवादी काँग्रेस ५ जागांवर विजयी झाला आहे.*

***रायगडमधे** २१ जागा जिंकून शिवसेना सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने १६ तर भाजपाने १५ जागा जिंकल्या आहेत. जिल्ह्याच्या राजकारणावर दीर्घकाळ वर्चस्व गाजवणाऱ्या शेतकरी कामगार पक्षाला एकही जागा जिंकता आली नाही.*

***धाराशिव** जिल्हा परिषदेत महायुतीचा विजय निश्चित झाला आहे. भाजपाला १२ आणि शिवसेनेला १४ जागा मिळाल्या आहेत. तर राष्ट्रवादी काँग्रेसला १४ आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला सहा जागा जिंकता आल्या. धाराशिव जिल्ह्यात ढोकी पंचायत समितीमधे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उमेदवाराचा केवळ एका मताने विजय झाला आहे.*

***परभणीत** भाजपाने सर्वाधिक २३ जागा जिंकल्या आहेत. तर राष्ट्रवादी काँग्रेस १५, शिवसेना ५, काँग्रेस तीन आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष ६ जागांवर विजयी झाला आहे.*

***सोलापूरमधे** भाजपा एकहाती सत्ता मिळवेल हे स्पष्ट झालं आहे. भाजपाने सर्वाधिक ३८ जागा जिंकल्या आहेत.*

***लातूरमधे** सर्वाधिक २३ जागा जिंकत काँग्रेस सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. मात्र महायुतीतले घटक पक्ष भाजपाला १८, राष्ट्रवादी काँग्रेसला १२ आणि शिवसेनेने एका जागेवर विजय मिळवल्यामुळे महायुतीला बहुमत मिळालं आहे.)*

<><><><><>

पुणे महानगरपालिकेच्या महापौरपदी भाजपाच्या मंजुषा नागपुरे, तर उप महापौरपदी आरपीआयचे परशुराम वाडेकर हे बिनविरोध निवडून आले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या शीतल सावंत आणि काँग्रेसच्या अश्विनी लांडगे यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्यामुळे ही निवड बिनविरोध झाली.

लातूर महानगरपालिकेच्या महापौरपदी जयश्री सोनकांबळे आणि उप महापौरपदी स्नेहल उटगे यांची बिनविरोध निवड झाली आहे. आज या निवडींची औपचारिक घोषणा झाली. जालना शहराच्या पहिल्या महापौरपदी वंदना मगरे, तर उपमहापौरपदी राजेश राऊत यांची बिनविरोध निवड झाली.

नागपूर महापालिकेत नवनिर्वाचित महापौर नीता ठाकरे आणि उपमहापौर लाला हाथीबेड यांनी आज पदभार स्वीकारला. सभागृह नेते म्हणून बाल्या बोरकर आणि विरोधी पक्षनेते म्हणून काँग्रेसचे संजय महाकालकर यांनीही यावेळी पदभार स्वीकारला. अमरावती महापालिकेतही श्रीचंद तेजवाणी यांनी महापौर आणि सचिन भेंडे यांनी उपमहापौर पदाचा कार्यभार स्वीकारला.

<><><><><>

राज्यात लवकरच नोकर भरती प्रक्रिया नव्या पद्धतीने राबवली जाणार आहे. जवळपास ७० हजारांहून अधिक पदांची भरती टप्प्याटप्प्याने केली जाणार आहे. यामध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून सुमारे २० हजार पदे भरली जातील अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मुंबईत आयोजित बैठकीत ते बोलत होते. भरती प्रक्रियेत अनावश्यक

कागदपत्रे, लांब रांगा आणि विलंब टाळण्यासाठी ऑनलाईन आणि डिजिटल व्हेरिफिकेशन मॉडेल विकसित करण्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी भर देण्याच्या सूचना केल्या. भरती प्रक्रियेत कोणताही संशय, पक्षपात किंवा अन्याय होऊ नये, यासाठी संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक आणि विश्वासार्ह असावी. त्याचबरोबर युवकांच्या मनात शंका राहू नयेत, यासाठी प्रणाली स्वच्छ आणि वेगवान असणे गरजेचे आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

वास्तविक जगातल्या प्रणाली कशा कार्य करतात हे समजून घेण्यासाठी आणि पाठ्यपुस्तकांच्या पलीकडे व्यावहारिक अनुभव मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांनी उद्योग क्षेत्रातल्या व्यावसायिकांशी संपर्क साधण्याचा सल्ला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिला. परीक्षा पे चर्चा २०२६च्या नवव्या आवृत्तीच्या दुसऱ्या भागात आज त्यांनी देशभरातल्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना लहान स्टार्टअप्सद्वारे आपला उद्योजकतेचा प्रवास सुरू करण्यास प्रोत्साहित केलं.

विद्यार्थ्यांनी शिक्षण आणि सर्जनशील आवडीनिवडींना वेगळे किंवा परस्परविरोधी मार्ग मानू नये. कला आणि सर्जनशील छंद विद्यार्थ्यांना शैक्षणिक दबावामुळे निर्माण होणारा ताण आणि थकवा कमी करण्यास मदत करू शकतात, असं ते म्हणाले. त्याचवेळी शिस्त आणि प्रेरणा आवश्यक असल्याचंही त्यांनी सांगितलं.

- **- - होल्ड प्रधानमंत्री बाइट - - -**

- **<><><><><>**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांच्या वतीनं आयोजित इयत्ता १२ वीची परीक्षा उद्यापासून सुरू होत आहे.

या परीक्षेसाठी एकंदर १० हजार ६६४ कनिष्ठ महाविद्यालयांमधून १५ लाख ३२ हजार ४८७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली आहे. संपूर्ण राज्यात विद्यार्थ्यांसाठी ३ हजार ३८७ मुख्य केंद्रावर ही परीक्षा होणार आहे. प्रचलित पध्दतीप्रमाणे माहिती तंत्रज्ञान आणि सामान्य ज्ञान या दोन विषयांची परीक्षा ऑनलाईन पध्दतीनं घेतली जाणार आहे.

कोणतंही दडपण न घेता उत्सवाच्या भावनेने विद्यार्थ्यांनी परीक्षेला सामोरे जावे, अशा शब्दात शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी बारावी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.

<><><><><>

भारत आणि अमेरिका यांच्यातल्या संभाव्य व्यापार करारामुळं शेअर बाजारात आजही तेजी झाली. दिवसअखेर सेन्सेक्स ४८५ अंकांनी वधारून ८४ हजार ६६ अंकांवर बंद झाला. निफ्टी १७४ अंकांची वाढ नोंदवून २५ हजार ८६७ अंकांवर स्थिरावला.

सोन्या-चांदीच्या बाजारपेठेत आजही तेजी होती. चांदी आज पावणे ९ हजार रुपयांनी महाग होऊन किलोमागे २ लाख ६१ हजार रुपयांच्या पलीकडे गेली. सोन्याचे दर पावणे ३ हजार रुपयांनी वधारल्यानं एक तोळा २२ कॅरेट सोन्यासाठी १ लाख ५५ हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम मोजावी लागत होती.

<><><><><>

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेतून मुंबईचा संघ बाहेर पडला आहे. उपांत्य पूर्व फेरीत कर्नाटकनं मुंबईला ४ गडी राखून पराभूत केलं.

उपांत्य फेरीत कर्नाटकचा सामना उत्तराखंड सोबत होईल. जम्मू-काश्मीरचा सामना आंध्र प्रदेश आणि बंगाल यांच्यातल्या विजेत्याविरुद्ध होईल.

<><><><><>

राज्यातल्या शाळांमध्ये त्रिभाषा धोरण राबवण्यासंदर्भात शिक्षणतज्ञ डॉक्टर नरेंद्र जाधव यांच्या समितीने आज आपला अहवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सादर केला. लवकरच हा अहवाल मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात येईल.

<><><><><>

गेल्या २४ तासात मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी किमान तापमानात किंचित घट तर उत्तर कोकण आणि मध्य महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी तापमानात किंचित वाढ झाली.

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

//<><><><><>//